
बिचारं गाढव



मराठी : प्रतीक्षा




समुद्राजवळच्या एका छोट्याशा गावात, एक गाढव राहत होतं.
त्याचा मालक होता एक भलीमोठी लाल दाढी असलेला माणूस.



दररोज तो मालक गाढवाला एका बंदरावर घेऊन जायचा,

तिथं मोठ्या जहाजांमधून सामान उतरवलं जायचं



मालक रोज गाढवाच्या पाठीवर मोठे, जड बॉक्स लादायचा.


गाढव हे सगळं सामान बाजारापर्यंत घेऊन जायचं.



चालता चालता ते मोठ-मोठ्या जहाजांसमोरून ते जायचे, तेव्हा वाटेत मालक गाणी गुणगुणत रहायचा आणि गाढव मात्र थकून, दमून जड सामान वाहून न्यायचं.



लाल दाढीवाल्या त्या माणसाला ओझी वाहून गाढव किती थकलंय ते दिसतंच नव्हतं. येणाऱ्या प्रत्येक दिवशी गाढवाच्या पाठीवरचं ओझं मात्र वाढत होतं.



मग एक दिवस, गाढवाच्या मालकानं नवी व्हॅन विकत घेतली.

मालक गाढवाला म्हणाला, "आता मला तुझी गरज नाही", असं म्हणून मालकानं व्हॅन सुरू केली आणि निघून गेला.




पहिल्यांदा गाढव खूप खुश झालं. त्याला वाटलं, "आता मला जड सामान पाठीवरून नेण्याची काहीच गरज नाही." पण नंतर त्यानं विचार केला, आता मला खाऊ कोण घालणार?



गाढवाला वाटत होतं, कदाचित आपल्याला नवीन मालक मिळेल, ज्याला आपली खरंच गरज असेल.

पोस्टमनदादांना त्याची गरज नव्हती कारण त्यांच्याकडे त्यांची सायकल होती.



पोलिसमामांना पण गाढवाची गरज नव्हती.

कारण, त्यांच्याकडे वेगात पळणारी कार होती.



कोणालाच आपल्या गाढवाची गरज नव्हती.

शेतकरी दादांना पण नाही कारण, त्यांच्याकडे त्यांचा एक ट्रॅक्टर होता.



बिचारं गाढव दिवसभर रस्त्यावर भटकत राहीलं.

शेवटी, समुद्रकिनाऱ्यावर त्याला लहान मुलांची गर्दी दिसली.




ती सगळी लहान मुलं खेचरावर बसून फिरून येण्याची वाट बघत होती. पण इतकी गर्दी होती की त्यांना खूप वेळ त्यांचा नंबर येण्याची वाट बघावी लागत होती. मुलं पार कंटाळून गेली होती.



समुद्रावर उभ्या असलेल्या खेचराच्या मालकानं आपल्या गाढवाला पाहिलं,
"येऽऽ, माझी मदत कर", त्यानं गाढवाला बोलवलं.
गाढव चटकन तयार झालं आणि त्यामुळे सगळ्या छोट्या मुलांना पाठीवर बसून फिरून येता आलं.



आपण गाढवावरून फिरतोय कि खेचरावरून फिरतोय यानं त्या छोट्या मुलांना काहीच फरक पडत नव्हता. नंतर सगळी मुलं त्याच्या जवळ आली. त्याला थोपटलं, मिठाई खाऊ घातली.



सुर्य मावळायला लागल्यानंतर मालक खेचराला म्हणाला, "चला, आता घरी गेलं पाहिजे." पण, खेचराला असं वाटत होतं की गाढवानेही आपल्यासोबत घरी यावं.



"ठिक आहे, गाढवालाही येऊदे सोबत" मालक म्हणाला. जाताना जहाजांच्या प्रकाशात त्याला बंदर दिसलं आणि त्याच्या मनात विचार आला,

"आपल्या जुन्या मालकाची व्हॅन बंद पडली तर?"



समाप्त